भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/ २०१२-१३/५९**
युबीडी सीओ.बीपीडी एमसी.क्र. १७/१२.०५.००१/२०१२–१३ जुलै ०२, २०१२

सर्व प्राथमिक(नागरी) सहकारी बँकांचे
मुख्य कार्यकारी अधिकारी.

महोदय,
**फसवणुकी वरील महापरिपत्रक - वर्गीकरण व कळविणे**

कृपया, 'फसवणुकी - वर्गीकरण व कळविणे' ह्यावरील आमच्या महापरिपत्रकासोबत पाठविलेल्या आमचे पत्र डीबीएस. सीओ एफआर एमसी. बीसी. क्र. २/२३.०४.००१/२०११-१२ दि. जुलै ०१ २०११ चा संदर्भ घ्यावा. जून ३०, २०१२ पर्यंतच्या सर्व सूचना व मार्गदर्शक तत्वे अद्ययावत व एकत्रित करण्यात आली आहेत.

आपला,
(ए. उद्गाता)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

शहर बँक विभाग, केंद्रिय कार्यालय, गारमेंट हाऊस, पहिला मजला, डॉ. एबी रोड, वरळी, मंबई – ४०००१८, भारत,
फोन -**०२२ - २४९३ ९९३० – ४९, फॅक्स - ०२२ - २४९७ ४०३० / २४९२ ०२३१, ईमेल- rbiubdco@rbi.org.in**

**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **१) प्रस्तावना** | **३** |
| **२)फसवणुकीचे वर्गीकरण** | **३** |
| **३) आरबीआयकडे फसवणुकीचा अहवाल पाठविणे** | **४** |
| ३.१ रु १.० लाख पेक्षा कमी रकमेच्या फसवणुकी | ५ |
| ३.२ रु १.० लाख पेक्षा जास्त परंतु रु.२५ लाखांपेक्षा कमी रकमांच्या फसवणुकी | |
| ३.३ रु १०.० लाख व त्यावरील रकमेच्या फसवणुकी | ५ |
| ३.४ फसवणुकी करण्याबाबतची प्रकरणे | ५ |
| ३.५ **फसवणुकीच्या प्रयत्नांची प्रकरणे** | **५** |
| **४)तिमाही अहवाल** | ६ |
| ४.१ शिल्लक फसवणुकीवरील अहवाल | ६ |
| ४.२ फसवणुकीच्या प्रकरणांवरील प्रगती अहवाल | ६ |
| **५) संचालक मंडळाला दिलेला अहवाल** | **६** |
| ५.१ फसवणुकीचे प्रकरणे कळविणे | ६ |
| ५.२ फसवणुक-प्रकरणांचे तिमाही पुनरावलोकन | ६ |
| ५.३ फसवणुकी प्रकरणांचे वार्षिक पुनरावलोकन | ७ |
| **६) पोलिस/सीबीआय ह्यांना फसवणुकी कळविण्यासाठी मार्गदर्शक तत्वे** | ८ |
| (७) फसवाफसवीची प्रकरणे बंद करणे | **९** |
| **(८)चोरी, बँकफोडी, डाका आणि बँक लुटण्याची प्रकरणे कळविणे** | **९** |
| **फसवणुकीबाबतच्या देखरेखीचा अहवाल** | |
| एफएमआर-१ बँकांमधील प्रत्यक्ष किंवा संशयित फसवणुकीवरील अहवाल | ११ |
| एफएमआर-२ शिल्लक फसवणुकीच्या शिल्लक प्रकरणांवरील तिमाही अहवाल | १६ |
| एफएमआर-३ फसवणुकीच्या प्रकरणांचा तिमाही प्रगती अहवाल | २१ |
| एफएमआर-४ डाके/बँकफोडी/ चोऱ्या/ लुटालुटीवरील अहवाल | २३ |

**१) प्रस्तावना**

१.१) बँकांमध्ये फसवणुकी, चोऱ्या, डाका, घातला जाणे ही एक काळजीची गंभीर बाब आहे. अशा फसवणुकी होऊ न देण्याची मूळ जबाबदारी बँकांवरच असली तरीही रिझर्व बँक (आरबीआय) वेळोवेळी बँकांना फसवणुकी होऊ शकणारी क्षेत्रे व फसवणुकी टाळण्यासाठी आवश्यक असे सुरक्षा उपाय कळवतच आहे. रिझर्व बँक, इतर बँकांना, आधी न घडलेल्या - कळविलेल्या अत्यंत हुशारीने केलेल्या फसवणुकीबाबतची सविस्तार माहिती कळवित असते, की त्यामुळे सुयोग्य अशा कार्यरीतींचे व अंतर्गत तपासणीचे आयोजन करुन बँका आवश्यक ते सुरक्षा उपाय/फसवणुकी कळण्याचे उपाय ह्यांचे अवलंबन करु शकतील. ज्यांनी बँकांना फसविले आहे असे तत्वशून्य कर्जदार व संबंधित पक्ष ह्यांच्या संबंधीची माहितीही बँकांना देण्यात येतच आहे की ज्यामुळे बँका त्यांच्याशी व्यवहार करते वेळी सावधगिरी ठेवतील. रिझर्व बँकही, कल्पक स्वरुपाच्या व आधी पाहण्यात न आलेल्या फसवणुकी बँकांना कळवीतच असते, ज्यामुळे योग्य अशा कार्यरीती व अंतर्गत तपासण्याच्या द्वारे बकाँ सावधानता/फसवणुकी टाळण्याचे उपाय योजू शकतील. बँकांची फसवणुक करणारे तत्वशून्य कर्जदार व संबंधित पक्ष ह्यांच्याबाबतही बँकांना कळविण्यात आलेले आहे, व त्यामुळे त्यांच्याबरोबर व्यवहार करतांना बँकांना सावधान राहता येईल. ही प्रक्रिया सातत्याने होत रहावी ह्यासाठी, बँकांनी, फसवणुकी व त्यावर त्यांनी त्याबाबत केलेला पाठपुरावा ह्याबाबतची संपूर्ण माहिती आरबीआयला कळविणे आवश्यक आहे. ह्यासाठी पुढील परिच्छेदात दिल्याप्रमाणे फसवणुकी कळविण्याबाबतची प्रणाली स्वीकारली जावी.

१.२) असे दिसून आले आहे की, अनेकदा बँकेत फसवणुकी झाल्यानंतर बऱ्याच काळानंतर त्या उघडकीस येतात. कधीकधी आरबीआयकडे पाठविलेले फसवणुकींचे अहवाल विलंबाने आणि संपूर्ण माहिती न देता पाठविले जातात. कधीकधी तर वर्तमानपत्रातील बातम्यांमधूनच मोठ्या रकमांच्या फसवणुकी झाल्याचे आरबीआयला कळते. ह्यासाठी बँकांनी खात्री करून घ्यावी की फसवणुकीची माहिती कळविण्याबाबतची त्यांची प्रणाली व्यवस्थित असेल व त्यामुळे फसवणुकीबाबतची माहिती अविलंब कळविली जाईल. आरबीआयला फसवणुकीची प्रकरणे कळविण्यातील विलंबाबत बँकांनी त्यांचा कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली पाहिजे.

१.३) फसवणुकी कळविण्याबाबतचा विलंब व त्यामुळे होणारा, अन्य बँकांना फसवणुक करण्याची कार्यरीत कळविण्यामधील विलंब व परिणामी तत्वशून्य कर्जदाराबाबत बँकांना द्यावयाच्या सावधानतेच्या इशाऱ्यामधील विलंब ह्यामुळे अन्य ठिकाणीही अशाच फसवणुकी केल्या जाऊ शकतात. ह्यासाठी बँकांनी, फसवणुकीची प्रकरणे आरबीआयला कळविताना, ह्या परिपत्रकात दिलेल्या कालावधीचे काटेकोरपणे पालन करावे. तसे न केल्यास, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) च्या कलम ४७(अ) खाली विहित केलेल्या दंडात्मक कारवाई साठी त्या पात्र ठरतील.

१.४) ह्या परिपत्रकात संदर्भित केलेले सर्व अहवाल पाठविण्याची जबाबदारी असलेला व महाव्यवस्थापकाचा दर्जा असलेला एक विशेष अधिकारी बँकांनी नेमस्त करावा.

**(२) फसवणुकीचे वर्गीकरण**

२.१) अहवाल पाठविण्यात एकसमानता असावी ह्यासाठी भारतीय दंड संहितेमधील तरतुदींवर आधारित फसवणुकीचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले आहे.

अ) अफरातफर व गुन्हेगारी स्वरुपाचा विश्वासघात

ब) बनावट संलेखाद्वारे लबाडीने रोखीकरण, खाते पुस्तकात लबाडीने फेरफार करुन किंवा खोट्या खात्याद्वारे व मालमत्तेच्या रुपांतरणाद्वारे.

क) बक्षिस किंवा बेकायदेशीर लाभासाठी अनाधिकृत कर्जसुविधा देणे.

ड) निष्काळजीपणा व रोख रकमेत तूट

ई) फसविणे व बनावटीकरण

फ) विदेशी मुद्रेच्या व्यवहारातील अनियमितता
ग) वरीलपैकी विशिष्ट शीर्षकांखाली न येणारी अन्य प्रकारची फसवणुक

२.२) वरील (ड) व (फ) मध्ये संदर्भित अशी "निष्काळजीपणा व रोख रकमेत तूट" आणि "विदेशी मुद्राव्यवहारातील अनियमितता" ह्याबाबतची प्रकरणे ही फसवाफसवी/अफरातफर बाबतचा हेतु सिध्द झाल्यास/संशयास्पद असल्यास त्यांचा अहवाल पाठविला जावा. तथापि, पुढील बाबतील, उघडकीस आल्यावर फसवाफसवीचा हेतु सिध्द न झाल्यास/ संशयित न वाटल्यासही ती प्रकरणे त्यानुसार कळविली जावीत.

अ) रोख रकमेत रु १००००/- पेक्षा जास्त तूट असलेली प्रकरणे आणि

ब) व्यवस्थापन/ऑडिटर/तपासनीस ह्यांना आढळलेली व रोख रक्कम हाताळणाराने तूट आल्याच्या दिवशीच न कळविलेली अशी रु ५०००/- पेक्षाधिक रोख रक्कम तूट असलेली प्रकरणे.

२.३) एकसमानता येऊन पुनरावृती टाळण्यासाठी, बनावट संलेखाबाबतच्या फसवणुकी, फक्त प्रदान करणाऱ्या बँकरनेच कळवाव्यात. तथापि, एखाद्या चोख/खऱ्या संलेखाची रक्कम ही मालक नसलेल्या व्यक्तीने लबाडीने लंपास करण्याबाबत मात्र फसविल्या गेलेल्या गोळा करणाऱ्या बँकेने फसवणुकीचा अहवाल आरबीआयकडे पाठवावा. प्रत्यक्ष वटविण्यापूर्वीच रक्कम क्रेडिट केली गेली आहे व तो संलेख खोटा/बनावट असून देणाऱ्या (पेईंग) बँकेने परत पाठविला आहे अशा संलेखांच्या गोळा करण्याच्या प्रकरणात, गोळा करणाऱ्या बँकेने आरबीआयकडे एफएमआर - १ सादर करावा, कारण तो संलेख वटविला जाण्यापूर्वीचे त्याचे पैसे दिले गेल्याने तिचा तोटा झाला आहे.

**२.४) एकाच बँकेच्या दोन किंवा अधिक शाखांशी संबंधित फेरफार केलेल्या/खोट्या चेक्सचे रोकडीकरण.**

२.४.१) एकाच बँकेच्या दोन किंवा अधिक शाखांशी संबंधित व फेरफार केलेल्या/खोट्या चेकच्या गोळा करण्याबाबत, जेथे त्या फेरफार केलेल्या/खोट्या चेकचे रोकडीकरण झालेले आहे त्या शाखेने ती फसवणुक त्या बँकेच्या मुख्य कार्यालयाला कळवावी. त्यानंतर त्या बँकेचे मुख्य कार्यालय आरबीआयकडे फसवणुकीचा रिर्पोट दाखल करील.

२.४.२) कोअर बँकिंग सोल्युशन (सीबीएस) खाली,एखाद्या बँकेच्या दोन किंवा अधिक शाखांशी संबंधित, एखाद्या फेरफार केलेल्या/खोट्या चेकचे पैसे दिले गेल्यास कोणत्या शाखाने अहवाल पाठवावा ह्याबाबत वाद/मतभेद असू शकतो. म्हणजे त्या चेकाच्या आदेशकाचे खाते असलेली शाखा की जेथे त्या चेकाचे रोकडीकरण झाले आहे ती शाखा. अशा बाबतीतही, ज्या शाखेने त्या फेरफार केलेल्या/खोट्या चेकचे प्रदान केले आहे. त्याच शाखेने बँकेच्या मुख्य कार्यालयात अहवाल दाखल करावा. त्यानंतर ते मुख्य कार्यालय आरबीआयकडे फसवणुकीचा रिपोर्ट दाखल करील.

२.५) चोरी, बँकफोडी, दरोडा, डाका ह्यांची प्रकरणे फसवणुकी म्हणून कळविण्यात येऊ नयेत. अशा प्रकरणांचा अहवाल परिच्छेद ८ मध्ये दिल्यानुसार वेगळा पाठविला जावा.

**(३) भारतीय रिझर्व बँकेला फसवणुकीबाबत कळविणे.**
(३) **<u>रिझर्व बँकेकडे फसवणुकी कळविणे</u>**
(३.१) **<u>रु.१.०० लाखापेक्षा कमी रकमेबाबतच्या फसवणुकी</u>** - रु.१.०० लाखापेक्षा कमी रकमेच्या वैय्यक्तिक फसवणुकी एक-एक अशा रिझर्व बँकेला कळविल्या जाऊ नयेत. तथापि, अशा प्रकारच्या फसवणुकीबाबतची आकडेवारी व माहिती, परिच्छेद ४.१ मध्ये दिलेल्या तिमाही विवरणपत्राद्वारे आरबीआयला कळविली जावी.

(३.२) **<u>रु.१.०० लाख व त्यापेक्षा अधिक परंतु रु.२५.०० लाखांपेक्षा कमी रकमेच्या फसवणुकी</u>** - रु.१.०० लाखा व त्यापेक्षा अधिक परंतु रु.२५.०० लाखांपेक्षा कमी रकमेच्या फसवणुकी, त्या आढळून आल्याच्या तारखेपासून तीन आठवड्यांच्या आत, एफएमआर-१ नमुन्यामध्ये, त्या बँकेचे मुख्य कार्यालय रिझर्व बँकेच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकारक्षेत्राखाली येते त्या, रिझर्व बँकेच्या नागरी बँका विभागाच्या प्रादेशिक कार्यालयाकडे कळवाव्यात.

(३.३) **<u>रु.२५.०० लाख व त्यावरील रकमांच्या फसवणुकी</u>** –

(३.३.१) रु.२५ लाख व त्यावरील रकमेच्या वैय्यक्तिक फसवणुकींची प्रकरणे, ती उघडकीस आल्याच्या तारखेपासून तीन आठवड्यांच्या आत, एफएमआर-१ मध्ये दिलेल्या नमुन्यात, फ्रॉड्स मॉनिटरिंग सेल, बँकिंग पर्यवेक्षण विभाग, भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय, वर्ल्ड ट्रेड सेंटर – १, कफ परेड, मुंबई - ४०० ००५ ह्यांचेकडे कळविण्यात यावीत. एफएमआर-१ ची प्रत त्या बँकेचे मुख्य कार्यालय रिझर्व बँकेच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकारक्षेत्राखाली येते त्या, रिझर्व बँकेच्या नागरी बँका विभागाच्या प्रादेशिक कार्यालयाकडे पाठविण्यात यावी.

(३.३.२) वरील परिच्छेद ३.३.१ मध्ये दिलेल्या आवश्यकतांव्यतिरिक्त, त्या फसवणुकीची माहिती, त्या बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या नजरेस ती फसवणुक आल्याच्या तारखेपासून एक आठवड्याच्या आत, डीओ लेटरने, प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक, बँकिंग पर्यवेक्षण विभाग, भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय ह्यांच्याकडे कळविण्यात यावी. त्या पत्रात त्या फसवणुकीचा थेडक्यात सारांश ( म्हणजे रक्कम, फसवणुकीचे स्वरुप, थोडक्यात फसवणुकीची पध्दत, शाखा/कार्यालयाचे नाव, संबंधित पक्षांची नावे ( मालकी/भागीदारी संस्था किंवा प्रायवेट लि. कंपन्या असल्यास त्या मालकांची, भागीदारांची व संचालकांची नावे ), संबंधित अधिकाऱ्यांची नावे, आणि पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे काय ह्या गोष्टी दिल्या जाव्यात. ह्या डीओ लेटरची एक प्रत त्या बँक शाखेचे मुख्य कार्यालय रिझर्व बँकेच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकारक्षेत्राखाली येते त्या, रिझर्व बँकेच्या नागरी बँका विभागाच्या प्रादेशिक कार्यालयाकडे पाठविण्यात यावी.

(३.४) **<u>तत्वशून्य कर्जदारांनी केलेल्या फसवणुकी</u>**

(३.४.१) असे दिसून आले आहे की, कंपन्या, भागीदारी/मालकी कंपन्या आणि/किंवा त्यांचे संचालक/भागीदार ह्यांच्यासह तत्वशून्य अशा कर्जदारांद्वारे पुढील काही रीतींनी मोठ्या संख्येने फसवणुकी केल्या जातात

(१) समाशोधन क्रियेमध्ये खोटे संलेख वटविणे किंवा काईट फ्लायिंग

(२) बँकेला माहित नसताना प्लेज केलेले स्टॉक्स काढून घेणे/गहाणवट ठेवलेल्या स्टॉक्सची वासलात लावणे/स्टॉक स्टेटमेंटमध्ये स्टॉकची किंमत फुगवून दाखविणे व बँकेकडून अधिकतर अर्थ सहाय्य मिळविणे

(३) निधी दुसरीकडे वळविणे, वित्तीय शिस्तीमध्ये कर्जदारांनी रस न घेणे किंवा गुन्हेगारी वृत्तीने दुर्लक्ष करणे आणि वाईट हेतूने ते एकक आजारी पडल्याने व्यवस्थापकीय अपयश येणे, आणि बँकेच्या अधिकाऱ्यांद्वारे त्या कर्जखात्याच्या कार्यवाहीबाबत योग्य देखरेख न केल्याने ढिलाई आल्याने ती अग्रिम राशी वसुल करणे कठीण झाल्याने बँकेला आर्थिक तोटा येणे

कर्ज खात्यांमधील फसवणुकींसाठी, एफएमआर-१ च्या भाग ब खाली विहित केलेली अतिरिक्त माहिती देण्यात यावी.

(३.५) **<u>फसवणुकीच्या प्रयत्नांची प्रकरणे</u>** – फसवणुक केली गेली असती तर बँकेचे नुकसान रु.२५.०० लाख किंवा अधिक झाले असते अशा फसवणुकींची प्रकरणे, त्या फसवणुकीचे प्रयत्न हाणून पाडण्याबाबत किंवा फोल ठरल्याबाबत बँकांना कळल्यावर, दोन आठवड्यांच्या आत, त्याबाबतचा रिपोर्ट, फ्रॉड मॉनिटरिंग सेल, बँकिंग पर्यवेक्षण विभाग, भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय, मुंबई ह्यांना पाठविण्यात यावा. ह्या अहवालात पुढील गोष्टी असाव्यात

(.) फसवणुकीच्या प्रयत्नाची कार्यरीत

(.) तो फसवणुकीचा प्रयत्न कसा फसला/हाणून पाडण्यात आला.

(.) विद्यमान प्रणाली व नियंत्रणे अधिक बलवान करण्यासाठी बँकेने केलेले उपाय

(.) जेथे फसवणुक करण्याचा प्रयत्न केला गेला तेथे केलेल्या नवीन प्रणाली व नियंत्रणे

फसवणुकीच्या अशा प्रयत्नांवरील अहवाल संचालक मंडळाच्या ऑडिट कमिटीपुढे ठेवला जावा.

आरबीआयला पाठवावयाच्या इतर अहवालांमध्ये अशी प्रकरणे समाविष्ट करु नयेत.

## (४) तिमाही अहवाल (रिटर्न्स)

### ४.१) शिल्लक फसवणुकीवरील अहवाल (एफएमआर-२)

४.१.१) बँकांनी, एफएमआर-२ नमुन्यामध्ये दिल्यानुसार शिल्लक फसवणुकीबाबतच्या तिमाही अहवालची प्रत्येकी एक प्रत रिझर्व बँकेचे केंद्रीय कार्यालय व त्या बँकेचे मुख्यालय, रिझर्व बँकेच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकार क्षेत्राखाली येते त्या कार्यालयाकडे संबंधित तिमाहीची अखेर झाल्याच्या १५ दिवसांच्या आत पाठवावी. ही माहिती केवळ सॉफ्ट कॉपीच्या स्वरुपातच पाठवावी. तिमाहीच्या अखेरीस शिल्लक अशी फसवणुक नसल्यास त्या बँकांनी **निल** रिपोर्ट पाठवावा.

४.१.२) ह्या अहवालाच्या विभाग अ मध्ये त्या तिमाहीच्या अखेरीस शिल्लक असलेल्या फसवणुकीची माहिती द्यावयाची असते. विभाग ब व क मध्ये, त्या तिमाहीतील अनुक्रमे वर्गीकरण-निहाय व फसवणुक करणारानुसार (प्रिप्रेट्रेटरवाईज) फसवणुकीची माहिती द्यावयाची आहे. विभाग ब व क मध्ये दाखविलेल्या त्या तिमाही दरम्यानच्या फसवणुकीची संख्या व एकूण रक्कम त्या अहवालच्या विभाग अ मधील स्तंभ ४ व ५ च्या बेरेजेशी जुळली पाहिजे.

४.१.३) वरील अहवालाचा एक भाग म्हणून बँकांनी प्रमाणपत्र द्यावयाचे आहे की, त्या तिमाहीमध्ये त्यांनी एफएमआर-१ मध्ये रिझर्व बँकेला कळविलेली रु १ लाख व त्यावरील रकमेची वैय्यक्तिक प्रकरणे ही त्या बँकेच्या संचालक मंडळासमोर ठेवण्यात आली असून, एफएमआर-२ च्या भाग-१ मध्ये (स्तंभ ४ व ५) आणि भाग ब व क मध्यही समाविष्ट करण्यात आली आहेत.

### ४.२) फसवणुकीवरील प्रगती अहवाल (एफएमआर - ३)

४.२.१) बँकांनी, रु १.०० लाख व त्यापेक्षा अधिक रकमेच्या फसवणुकींबाबतचे तिमाही प्रगती अहवाल, संबंधित तिमाहीची आखेर झाल्यावर १५ दिवसांच्या आत दिलेल्या एफएमआर-३ नमुन्यामध्ये, आरबीआयच्या केंद्रीय कार्यालयातील, बँकिंग पर्यवेक्षण विभागाकडे आणि त्या बँकेचे मुख्य कार्यालय ज्याच्या अधिकार क्षेत्राखाली येते त्या आरबीआयच्या प्रादेशिक कार्यालयाकडे पाठवावेत.

४.२.२) तिमाहीमध्ये कोणतीही प्रगती न झालेल्या फसवणुकींबाबत अशा प्रकरणांची यादी, थोडक्यात वर्णन व शाखेचे नाव आणि अहवाल पाठविल्याची तारीख ह्यासह एफएमआर-३ च्या विभाग ब मध्ये द्यावी.

(४.२.३) रु.१.० लक्ष व त्यावरील रकमेच्या फसवणुकींची कोणतीही प्रकरणे प्रलंबित नसल्यास बँकांनी **"निल** रिपोर्ट"सादर करावा.

## (५)संचालक मंडळाला द्यावयाचे अहवाल

### ५.१) फसवणुकी कळविणे

५.१.१) बँकांनी खात्री करुन घ्यावी की, रु १ लाख व त्यावरील रकमेच्या फसवणुकी त्या घडल्याचे आढळल्यावर लगेच त्यांच्या संचालक मंडळाना कळविल्या जातील.

५.१.२) अशा अहवालांमध्ये, इतर बाबींसह, संबंधित शाखा अधिकाऱ्यांचे व नियंत्रक अधिकाऱ्यांचे अपयश ह्याबाबत नोंद घेण्यात यावी आणि त्या फसवणुकी बाबत जबाबदार अधिकाऱ्याविरुध्द योग्य कारवाई करण्याबाबत विचार केला जावा.

**५.२) फसवणुकीचे तिमाही पुनरावलोकन**

५.२.१) आरबीआयने विहित केलेल्या पुनरावलोकनच्या कॅलेंडरच्या अनुसार, मार्च, जून व सप्टेंबर अखेर संपणाऱ्या तिमाही मधील फसवणुकींची माहिती, संबंधित तिमाहीनंतरच्या महिन्यात, संचालक मंडळ/व्यवस्थापन समितीसमोर ठेवण्यात यावी.

५.२.२) ह्या माहितीसोबत, प्रत्येक फसवणुकींसंबंधाने विश्लेषक अशी आकडेशास्त्रीय पूरक माहिती देण्यात यावी. त्यामुळे संचालक मंडळाच्या ऑडिट कमिटीला फसवणुकींबाबत शिक्षा व प्रतिबंध ह्याबाबत सुयोग्य साहित्य मिळण्यास मदत होईल.

५.२.३) खाली विहित केल्याप्रमाणे, डिसेंबर वर्ष अखेरच्या वार्षिक पुनरावलोकनाचा विचार करता डिसेंबर अखेरच्या तिमाहीसाठी वेगळे पुनरावलोकन देण्याची आवश्यकता नाही.

**५.३) फसवणुकीचे वार्षिक पुनरावलोकन**

५.३.१) बँकांनी फसवणुकींचे वार्षिक पुनरावलोकन करुन संचालक मंडळ/सल्लागार मंडळासमोर त्यांच्या माहितीसाठी टिप्पणी ठेवावी. डिसेंबर अखेर संपलेल्या वर्षासाठी असलेली पुनरावलोकने, पुढील वर्षाच्या मार्च अखेरपूर्वी मंडळासमोर ठेवावीत ही, रिझर्व बँकेच्या निरीक्षक अधिकाऱ्यांच्या पडताळणीसाठी जपून ठेवावीत.

५.३.२) अशा प्रकारचे पुनरावलोकन करतेवेळी विचारात घ्यावयाचे मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) फसवणुक केली गेल्यावर, कमीतकमी वेळात, त्या उघडकीस आणण्यासाठी बँकेतील प्रणाली सक्षम आहेत काय.

(ब) कर्मचाऱ्यांच्या दृष्टिकोनातून फसवणुकींची तपासणी केली आहे काय, आणि आवश्यक तेथे, सार्वजनिक बँकांच्या बाबतीत, पुढील कारवाईसाठी त्या व्हिजिलन्स विनाविलंब सेलला कळविण्यात आल्या आहेत काय.

क) जबाबदार ठरलेल्या व्यक्तीला, आवश्यक तेथे, प्रतिरोधक अशी शिक्षा विनाविलंब देण्यात आली आहे काय

ड) प्रणाली व कार्यरीतींचे पालन करण्यामधील ढिलाईमुळे फसवणुकी झाल्या आहेत काय व तसे असल्यास, संबंधित कर्मचाऱ्यां कडून प्रणाली व कार्यरीतींचे काटेकोरपणे पालन केले जाण्याबाबत कारवाई करण्यात आली आहे काय व पळवाटा बंद केल्या आहेत काय.

ई) स्थानिक पोलिस किंवा सीबीआयला पुढील तपासासाठी कळविण्यात आले आहे काय.

५.३.३) वार्षिक पुनरावलोकनात, इतर बाबींसह पुढील माहितीचाही समावेश असावा :

अ) मागील दोन वर्षांच्या तुलनेत, ह्या वर्षात उघडकीस आलेल्या एकूण फसवणुकी व संबंधित रक्कम.

ब) परिच्छेद २.३ मध्ये दिल्याप्रमाणे निरनिराळ्या वर्गवारीनुसार फसवणुकींचे विश्लेषण आणि शिल्लक फसवणुकींच्या तिमाही अहवालामध्ये (एफएमआर-२ अनुसार) निर्देशित केलेली निरनिराळी व्यापारी/व्यवहार क्षेत्रे.

क) वर्षभरामध्ये कळविलेल्या प्रमुख फसवणुकींची कार्यरीत आणि त्याबाबत सध्याची स्थिती.

ड) रु १ लाख व त्यामधील रकमेच्या फसवणुकींची सविस्तर विशलेषणे.

इ) फसवणुकींमुळे वर्षभरात बँकेचे झालेले अंदाजे नुकसान, वसूल झालेली रक्कम व तरतुदी.

फ) जेथे कर्मचाऱ्यांचा संबंध आहे अशा प्रकरणांची संख्या (रकमेसह) आणि कर्मचाऱ्यांविरुध्द केलेली कारवाई.

ग) फसवणुकी उघडकीस आणण्यात लागलेला वेळ (तीन महिने, सहा महिने, व एक वर्षामध्ये, फसवणुकी घडल्यापासून त्या उघडकीस आल्याचा कालावधी)

एच) सीबीआय/पोलिस ह्यांना कळविलेल्या फसवणुकींची स्थिती.

आय) बँकेने अंतिम कृति केली आहे अशा फसवणुकींची संख्या व वासलात झालेली प्रकरणे.

(ज) असे फसवणुकीचे प्रसंग कमी/किमान करण्यासाठी बँकेने वर्षभरात उचललेली प्रतिबंधात्मक/कठोर पाऊले कमतरतांवर उपाय केलेले आहेत ह्याची खात्री करण्यासाठी प्रणाली व कार्यरीतींची तपासणी केली आहे काय.

**(६) पोलिस/सीबीआय ह्यांना फसवणुकी कळविण्यासाठी मार्गदर्शक तत्वे**

६.१) राज्य पोलिस प्राधिकरणांकडे, अवैध पारितोषिकांसाठी बँकेने दिलेले अनाधिकृत क्रेडिट, निष्काळजीपणा, व रोख रकमेत तूट, फसविणे, बनवाबनवी इत्यादी कळविण्यासाठी खाजगी क्षेत्रातील बँकांनी (भारतात कार्यरत असलेल्या विदेशी बँकांसह) पुढील मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे :-

अ) फसवणुक/अफरातफरीची प्रकरणे हाताळतांना बँकांनी केवळ संबंधित रक्कम तातडीने परत मिळविण्याचा हेतु ठेवू नये, तर जनतेच्या हिताच्या दृष्टिने दोषी व्यक्ति विना-शिक्षा सुटून जाणार नाहीत ह्याचीही खात्री करून घ्यावी.

ब) ह्यासाठी, एक सर्वसाधारण नियम म्हणून पुढील प्रकरणे न चुकता राज्य पोलिसनांच कळवावीत.

१) बाहेरील व्यक्तींनी, स्वतःहून आणि/किंवा बँकेचे कर्मचारी/मॅनेजर्स ह्यांच्या संगनमताने, रु १.०० लाख व त्यावरील रकमेच्या फसवणुकीची प्रकरणे.

२) बँकेच्या कर्मचाऱ्यांची, रु १०,०००/- पेक्षा अधिक असलेल्या बँकेच्या पैशांच्या फसवणुकीची प्रकरणे.

(६.२) **<u>डीडी/टीटी/पेऑर्डर्स/चेक्स/डिव्हिडंड वॉरंट्स ह्यांचे लबाडीने रोखीकरण केले गेल्यास पोलिस-तक्रार दाखल करणे</u>**

(६.२.१) बनावट संलेखांद्वारे केलेल्या फसवणुकीबाबत, प्रदानकर्त्या बँकेने पोलिस तक्रार (एफआयआर) दाखल करावी गोळा करणाऱ्या बँकेने नव्हे.

(६.२.२) तथापि, खरा संलेख गोळा करण्यास पाठविला असून, स्वतः त्याचा मालक नसलेल्या व्यक्तीने त्याची रक्कम लबाडीने गोळा केल्यास, फसविल्या गेलेल्या गोळा करणाऱ्या बँकेने पोलिस तक्रार (एफआयआर) दाखल करावी.

(६.२.३) वसुली होण्यापूर्वीच ज्यांची रक्कम जमा करण्यात आली आहे व नंतर तो संलेख खोटा/बनावट असल्याचे दिसून आल्याने, प्रदानकर्त्या बँकेला परत करण्यात आला अशा संलेखाबाबत, गोळा करणाऱ्या बँकेने

पोलिस तक्रार दाखल करावी, कारण त्या संलेखाची वसुली होण्यापूर्वीच त्याची रक्कम दिली गेली असल्याने त्या बँकेचाच तोटा होतो.

(६.२.४) एकाच बँकेच्या दोन किंवा अधिक शाखांचा संबंध असलेल्या व खोडाखोड/खोटा चेक दिला जाण्याबाबत, लबाडीने केलेल्या निकासीविरुध्द प्रदान करणाऱ्या बँकेने पोलिस तक्रार (एफआयआर) दाखल करावी.

(६.२.५) एकाच बँकेच्या, सीबीएस खाली असलेल्या, दोन किंवा अधिक शाखांशी संबंधित असलेल्या व खोडाखोड केलेल्या/ खोट्या चेकचे प्रदान/ रोखीकरण केले गेल्यास, लबाडीने केलेल्या निकासीचे प्रदान करणाऱ्या शाखेने पोलिस तक्रार दाखल करावी

(७) **<u>फसवाफसवीची प्रकरणे बंद करणे</u>** –

बंद केलेल्या, फसवणुकीच्या प्रकरणांची माहिती बँकांनी, त्यांचे मुख्यालय, ज्याच्या अधिकार - क्षेत्राखाली येते त्या, रिझर्व बँकेच्या नागरी बँका विभागाच्या प्रादेशिक कार्यालयाकडे, पुढील कारवाई करण्याची आवश्यकता का नाही ह्याच्या कारणांसह कळवावी. तिमाहीमध्ये बंद केलेल्या फसवणुकीची प्रकरणे एफआयआर-२ च्या तिमाही अहवालांद्वारे कळविली जावीत.

केवळ पुढील बाबतीत असलेल्या कारवाया पूर्ण केल्या गेल्या आहेत अशीच फसवणुकीची बंद केलेली प्रकरणे बँकांनी कळवावीत –

(अ) पोलिस/कोर्ट ह्यामध्ये प्रलंबित असलेली फसवणुकीची प्रकरणे शेवटी निकालात काढण्यात आली आहेत

(ब) कर्मचाऱ्यांच्या जबाबदारीबाबतची तपासणी पूर्ण झाली आहे

(क) फसवणुकीची रक्कम वसुल झाली आहे किंवा राईट ऑफ केली गेली आहे

(ड) लागु आहे तेथे विम्याच्या दाव्याची तडजोड झाली आहे

(ई) बँकेने प्रणाली व कार्यरीतींचे पुनवरालोकन केले असून, फसवणुक होण्यामधील घटक ओळखले आहेत व त्रुटी काढून टाकल्या असून त्याबाबत संचालक मंडळाने प्रमाणितही केले आहे.

प्रलंबित असलेल्या व त्यातही विशेषतः जेथे कर्मचारी वर्गाकडून कारवाई पूर्ण करण्यात आली आहे अशा प्रकरणांबाबत, बँकांनी, अंतिम वासलातीसाठी पोलिस/कोर्टाचा सातत्याने पाठपुरावा करावा.

**(८) चोरी, बँकफोडी, डाका व बँक लुटण्याची प्रकरणे कळविणे.**

८.१) बँकफोडी, डाके, चोऱ्या व बँक लुटण्याबाबतच्या घटना घडल्याबरोबर बँकांनी त्याबाबतची माहिती पुढील प्राधिकरणांना फॅक्स/ईमेलने लगेच कळविली पाहिजे.

अ) मुख्य प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक, भारतीय रिझर्व बँक, **श**हर बँक विभाग,केंद्रीय कार्यालय ,गारमेंट हाऊस,वरळी,मुंबई - ४०००१८

ब) भारतीय रिझर्व बँकेचे प्रादेशिक कार्यालय, बाधित झालेल्या शाखांमधील सुरक्षा व्यवस्थांबाबत संबंधित प्राधिकरणांबरोबर हा प्रश्न घेण्यासाठी प्रादेशिक कार्यालयाला साह्य करण्यासाठी, ती चोरी/डाका/दरोडा/ घडलेली आहे त्या राज्यामधील नागरी बँक विभाग ( अनुमती/संमती )

ह्या अहवालामध्ये फसवणुकीची कार्यरीत व इतर माहिती, एफएमआर - ४ मधील स्तंभ १ ते ११ मध्ये दिल्यानुसार समाविष्ट केली जावी.

८.२) बँकांनी, रिझर्व बँकेच्या केंद्रीय कार्यालयामधील बँकिंग पर्यवेक्षण विभागाकडे, तसेच, त्या बँकेचे मुख्य कार्यालय रिझर्व बँकेच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात येते त्या कार्यालयाकडे, त्या तिमाहीशी संबंधीत अशी सर्व प्रकरणे एकत्रित केलेला तिमाही अहवाल एफएमआर-४ मध्ये देलेल्या नमुन्यात सादर करावा. हा अहवाल, सबंधित तिमाही संपल्यावर १५ दिवसांच्या आत सादर केला जावा.

८.३) ज्या बँकांच्या बाबतीत चोरी, बँकफोडी, डाका, आणि/किंवा दरोडा ह्यांचे एकही प्रकरण तिमाहीत घडले नसेल त्यांनी **‘निल’** रिपोर्ट पाठवावा.

जोडपत्र

**एफएमआर-१**

**बँकांमधील प्रत्यक्ष किंवा संशयित फसवणुकीबाबत अहवाल**

(परिच्छेद ३ अन्वये)

भाग अः फसवणुकीचा अहवाल

| | |
|---|---|
| १) बँकेचे नाव | |
| २) फसवणुक क्रमांक [१] | |
| ३) शाखेची माहिती [२] | |
| अ) शाखेचे नाव | |
| ब) शाखेचा प्रकार | |
| क) स्थळ | |
| ड) जिल्हा | |
| ई) राज्य | |
| ४) मुख्य पक्षाचे/खात्याचे नाव [३] | |
| ५. अ. फसवणुक झालेले क्षेत्र [४] | |
| ५. ब. फसवणुक कर्जखात्यात झाली काय? | होय/नाही |
| ६. अ फसवणुकीचे स्वरुप [५] | |
| ७) संबंधित एकूण रक्कम [६] (रु लाखमध्ये) | |
| ८. अ. घडल्याची तारीख [७] | |
| ८. ब. उघडकीस आल्याची तारीख [८] | |
| ८. क. फसवणुक उघडकीस घेण्यातील विलंबाची कारणे | |
| ८. ड. आरबीआयला कळविले गेल्याची तारीख [९] | |
| ८. ई. आरबीआयला फसवणुक कळवीण्यातील विलंबाची कारणे | |
| ९. अ. थोडक्यात पूर्वेतिहास | |
| ९ .ब. कार्यकारी रीत (थोडक्यात व नेमकी) | |
| १०) फसवणुक कोणी केली | |
| अ. कर्मचारी | होय/नाही |
| ब. ग्राहक | होय/नाही |
| क. बाहेरील व्यक्ति | होय/नाही |
| ११ अ. शाखेने सादर केलेल्या कंट्रोल रिटर्न्सच्या छाननीद्वारे नियंत्रक कार्यालय (प्रादेशिक/क्षेत्रीय) ती फसवणुक शोधू शकेल काय | होय/नाही |
| ब. माहिती देण्याच्या प्रणालीत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे काय. | होय/नाही |
| १२. अ. फसवणुक प्रथम घडल्याची तारीख व ती उघडकीस आल्याची तारीख ह्या दरम्यान त्या शाखे/शाखांमध्ये अंतर्गत तपासणी/ऑडिट (काँकरंट ऑडिटसह) केले गेले होते काय? | होय/नाही.* |
| ब. होय असल्यास, अशा तपासणी/ऑडिटमध्ये ती फसवणुक का उघडकीस आली नाही? | |
| क. अशा तपासणी/ऑडिट दरम्यान ती फसवणुक | |

| | |
|---|---|
| उघडकीस न आल्यामुळे कोणती कारवाई करण्यात आली? | |
| १३. केलेली/करावयाची कारवाई | |
| अ. तपासणी एजन्सी /पोलिस तक्रार | |
| (१) पोलिस/ तपासणी एजन्सीकडे तक्रार दाखल केली आहे काय? | होय/नाही |
| (२) होय असल्यास तपासणी एजन्सी /पोलिस ह्यांच्या कार्यालयाचे/शाखेचे नाव. | |
| १)संदर्भाची तारीख | |
| २) प्रकरणाची सध्याची स्थिती | |
| ३) पोलिस/ तपासणी एजन्सीचा तपास पूर्ण झाल्याची तारीख | |
| ४ अ) (i)पोलिस/ तपासणी एजन्सी द्वारे तपास कामाचा अहवाल सादर केल्याची तारीख | |
| (ii)पोलिस/ तपासणी एजन्सी ला कळविले नसल्यास त्याची कारणे. | |
| ब. सहकारी कोर्ट /कोर्ट मध्ये वसुलीसाठी दाखल केलेला खटला. | |
| १) दाखल केल्याची तारीख | |
| २) सध्याची स्थिती | |
| क. विम्याबाबत दावा | |
| १) एखाद्या विमा कंपनीकडे दावा दाखल केला आहे काय? | होय/नाही. |
| २) तसे नसल्यास त्याचे कारण. | |
| ड. कर्मचाऱ्यांच्या बाबत केलेली कारवाई | |
| १) काही अंतर्गत चौकशी/तपास करण्यात आला आहे का/करण्याचे ठरत आहे का? | होय/नाही. |
| २) होय असल्यास तो पूर्ण झाल्याची तारीख | |
| ३) काही विभागीय चौकशी केली आहे काय/करण्याचे ठरत आहे काय? | |
| ४) होय असल्यास खालील नमुन्यानुसार माहिती द्यावी. | |
| ५) नाही असल्यास त्याची कारणे | |

**कर्मचाऱ्यांबाबत कारवाई**

| अनु. क्र. | नाव | पदनाम | प्रलंबन केले काय? | आरोपपत्र दाखल केल्याची तारीख | अंतर्गत चौकशी सुरु केल्याची तारीख | चौकशी पूर्ण झाल्याची तारीख | अंतिम आदेश दिल्याची तारीख | दिलेली शिक्षा | खटला भरणे/दोषी ठरविणे/दोष मुक्त होणे ह्याची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

| | |
|---|---|
| ई. अशा घटना घडू नयेत ह्यासाठी केलेले/करण्यात येणारे उपाय | |
| १४. (अ) वसूल झालेली एकूण रक्कम | |
| १) संबधित पक्षाकडून वसुल केलेली रक्कम | |
| २) विमा कंपनीकडून | |
| ३) अन्य स्त्रोतांकडून | |
| ब. बँकेला झालेला तोटा | |
| क. त्यासाठी ठेवलेली तरतुद | |
| ड. राईट ऑफ केलेली रक्कम | |
| १५. आरबीआयच्या विचारासाठी सूचना | |

*शाखेमध्ये सुरु केलेल्या तपासणी/ऑडीटचा प्रकार निर्देशित करावा. म्हणजेच, कॉंकरंट ऑडीट, स्टॅट्युटरी ऑडीट, अंतर्गत तपासणी इत्यादि.

**भाग बः कर्ज खात्यामधील फसवणुकींवरील अतिरिक्त माहिती**
(सर्व कर्ज खात्यांमधील फसवणुकींबाबत हा भाग पूर्ण करण्यात यावा.)

१. अ) ज्याची फसवणूक झाली त्या पार्टी चा व्यवसायिक पत्ता

| |
|---|
| |

ब) प्रोप्रायटर/पार्टनर/डिरेक्टर चा नांव व पत्ता

| अनु. क्र. | मालक/भागीदार /संचालकाचे नाव | पत्ता |
|---|---|---|
| | | |
| | | |

## २. खात्यांचा तपशील

| अनु. क्र. | खात्याचा प्रकार | मंजुरीची तारीख | मंजुरीप्राप्त मर्यादा | शिल्लक येणे |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## ३. संलग्न संस्थेच्या संचालक/मालकांची माहिती

| अनु क्र. | संलग्न सस्थेचे नाव आणि पत्ता | प्रोप्रायटर/पार्टनर/डिरेक्टर चे नांव | प्रोप्रायटर/पार्टनर/डिरेक्टर चा पत्ता |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**फसवणुकीचा अहवाल (एफएमआर-१) तयार करण्यासाठी सूचना**

[१] **फ्रॉड (फसवणुक) नंबरः** संगणकीकरण व संदर्भ शोधण्यास मदत व्हावी म्हणून हा देण्यात आला आहे. हा आल्फान्युमरिक क्रमांक असून त्यात पुढील गोष्टी आहेत : चार अक्षरे (बँकेच्या नावासाठी), दोन अंक वर्ष निर्देशित करण्यासाठी (०२, ०३ इत्यादी), तिमाहीसाठी दोन अंक ( जानेवारी ते मार्च ०१ इत्यादी) व अखेरचे चार अंक हे तिमाहीमध्ये कळविलेल्या फसवणुकीसाठी स्पष्ट धावते अंक.

[२] **शाखेचे नावः** फसवणुकीत एकापेक्षा अधिक शाखांचा संबंध असल्यास, जेथे रक्कम सर्वाधिक आहे आणि/किंवा जी सर्वात जास्त संबंधित आहे त्या शाखेचे नाव द्यावे. इतर शाखांची नावे, थोडक्यात पूर्वेतिहास/ कार्यरीत ह्या बाबत क्र.९ मध्ये दिली जावीत.

[३] **पक्षाचे नावः** फसवणुकीची ओळख पटविण्यासाठी स्पष्टपणे नाव दिले जावे. कर्जखात्यातील फसवणुकींसाठी कर्जदारांची नाव दिली जावीत. कर्मचाऱ्यांनी केलेल्या फसवणुकींबाबत, फसवणुकी ओळख पटविण्यासाठी, त्या कर्मचाऱ्याचे/कर्मचाऱ्यांची नाव/नावे दिली जावीत. जेथे फसवणुक झालेली आहे, (म्हणजे क्लियरिंग

अकाउंट/आंतर शाखा खाते) व ह्या फसवणुकीत एखाद्या विशिष्ट कर्मचाऱ्याचा हात असल्याचे लगेच कळून येत नसल्यास त्याची ओळख "क्लियरिंग/ आंतर शाखा खात्यातील फसवणुक" ह्या नावाने करावी.

[४] **फसवणुक आढळून आलेले क्षेत्रः** एफएमआर-२ (भाग अ) विवरणपत्रातील स्तंभ-१ मध्ये दिलेल्या संबंधित क्षेत्र द्यावे (रोकड, ठेवी/बचत/चालु/मुदत), अनिवासी खाती, अग्रिम राशी (कॅश क्रेडिट/मुदत कर्जे/बिल्स/इतर), विदेशी मुद्रा व्यवहार, आंतरशाखा खाती, चेक्स डिमांड ड्राफ्ट्स इत्यादी, समाशोधन इत्यादी खाती, ताळेबंदाबाहेरील बाबी (पतपत्रे/हमी/सहस्वीकार/इतर)

[५] **फसवणुकीचा प्रकारः** त्या फसवणुकीचे योग्य वर्णन करता येईल असा अंक पुढे दिलेल्या संबंधित वर्गीकरणातून निवडावा :- १) अफरातफर व गुन्ह्याच्या स्वरुपाचा विश्वासघात २) बनावट/संलेखाचा उपयोग करून/खाते पुस्तकात फेरफार करून किंवा खोट्या/बनावट खात्यांद्वारे किंवा मालमत्तेच्या रुपांतरणाद्वारे फसवणुक करुन रोखीकरण करणे. ३) बक्षिस किंवा बेकायदेशीर लाभासाठी अनधिकृत कर्जसुविधा देऊ करणे. ४) निष्काळजीपणा रोख रकमेतील तूट. ५) फसविणे व खोटे दस्ताऐवज देणे. ६) विदेशी मुद्रा व्यवहारातील अनियमितता. ७) इतर

[६] **संबंधित एकूण रकमः** सर्व ठिकाणी रक्कम ही लक्ष रुपयात दोन दशांश स्थळांपर्यंत दिली जावी.

[७] **आढळण्याची तारीखः** फसवणुक घडण्याची नेमकी तारीख देणे कठीण असल्यास, (उदा. काही कालावधीमध्ये गळती झालेली असल्यास किंवा कर्जदाराने केलेली विशिष्ट कृती व नंतर ती फसवणुकीची कृती असल्याचे ठरल्यावर ती नेमकी कोणत्या तारखेस केली गेली ते ठरवता न असल्यास) त्या व्यक्तीने फसवणुक करण्याची शक्यता असलेली सर्वात आधीची तारीख दिली जावी. (उदा. सन २००२ ह्या वर्षात केल्या गेलेल्या फसवणुकीसाठी १ जानेवारी २००२ ही तारीख घ्यावी), ज्या कालावधीमध्ये फसवणुक करण्यात आली आहे असा विशिष्ट तपशील, पूर्वेतिहास/कार्यरीतमध्ये देण्यात यावा.

[८] **उघडकीस आल्याची तारीख :** नेमकी तारीख उपलब्ध नसल्यास (म्हणजे, तपासणी/ऑडिट दरम्यान एखादी फसवणुक उघडकीस असल्यास किंवा रिझर्व बँकेच्या निदेशानुसार एखादा व्यवहार फसवणुक असल्याचे कळविले गेल्यास) ती फसवणुक म्हणून उघडकीस आल्याची तारीख म्हणून एखादी नाममात्र तारीख देण्यात यावी.

[९] **आरबीआयला कळविण्याची तारीखः** आरबीआयकडे, एफएमआर-१ फॉर्ममध्ये रिपोर्ट पाठविण्याची तारीख हीच कळविण्याची तारीख धरली जाईल. तत्पूर्वी त्याबाबत पाठविलेल्या फॅक्स किंवा डीओ पत्राची तारीख नव्हे.

*शाखेमध्ये कोणत्या प्रकारचे ऑडिट (उदा. कॉंकरंट ऑडिट, वैधानिक ऑडिट, अंतर्गत तपासणी इत्यादी) सुरु करण्यात आले आहे ह्याची वर्गवार माहिती बँकांनी द्यावी.

**एफएमआर-२**
**(परिच्छेद ४.१ अनुसार)**

**शिल्लक असलेल्या फसवणुकींवरील तिमाही अहवाल**
**बँकेचे नाव :**
**रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अहवाल :**

**भाग - अ शिल्लक फसवणुकी** **(रक्कम रु. लक्षमध्ये)**

| वर्ग | मागील तिमाहीच्या अखेरीस शिल्लक प्रकरणे | | विद्यमान तिमाहीत कळविलेली प्रकरणे | | विद्यमान तिमाहीत बंद केलेली प्रकरणे | | तिमाहीच्या अखेरीस शिल्लक असलेली प्रकरणे | | वसूल झालेली एकूण रक्कम | तिमाहीच्या आखेरीस शिल्लक प्रकरणांसाठी ठेवलेली तरतुद | विद्यमान तिमाहीमध्ये वसूल झालेली रक्कम | विद्यमान तिमाहीत राईट ऑफ केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या (२+४-६) | रक्कम (३+५-७) | रक्कम | रक्कम | रक्कम | रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| रोख | | | | | | | | | | | | |
| ठेवी<br>१.बचत<br>२.चालु<br>३.मुदत | | | | | | | | | | | | |
| अनिवासी खाती | | | | | | | | | | | | |
| अग्रिम राशी<br>१)कॅश क्रेडिट<br>२) मुदत कर्जे<br>३) बिल्स<br>४) इतर | | | | | | | | | | | | |
| विदेशी मुद्रा व्यवहार | | | | | | | | | | | | |
| आंतर शाखा खाती | | | | | | | | | | | | |
| चेक्स/डिमांड ड्राफ्ट्स इत्यादी | | | | | | | | | | | | |
| क्लियरिंग इत्यादी, खाती | | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ताळेबंदा बाहेरील<br>१)पतपत्रे<br>२)हमी<br>३)सह-स्वीकार<br>४)इतर | | | | | | | | | | | | |
| इतर | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | |

**टीपः** विदेशात कार्यालये/शाखा असलेल्या भारतीय बँकांसाठी, वरील आकडे हे देशांतर्गत स्थितीसंबंधाने आहेत. विदेशातील शाखा/कार्यालये ह्याबाबतचे आकडे, ह्याच नमुन्यात वेगळ्या कागदावर दिले जावेत.

## भाग - बः तिमाहीमध्ये कळविलेल्या फसवणुकींचे प्रकारानुसार वर्गीकरण

**बँकेचे नाव** ____________________________________________

| वर्ग | अफरातफर व गुन्हेगारी स्वरुपाचा विश्वासघात | | लबाडीने केलेले रोखीकरण/खातेपुस्तकात लबाडीने फेरफार आणि मालमत्तेचे रुपांतर | | बेकायदेशीर लाभासाठी दिलेली अनाधिकृत कर्ज सुविधा | | निष्काळजीपणा व रोख रकमेत तूट | | फसविणे व बनावटगिरि | | विदेशी मुद्रेमध्ये अनियमितता | | इतर | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या |
| रु एक लाखा पेक्षा कमी | | | | | | | | | | | | | | | | |
| रु १लाखा पेक्षा जास्त रु २५ लाखा पेक्षा कमी | | | | | | | | | | | | | | | | |
| रु२५ लाख व त्यापेक्षा अधिक | | | | | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | | | | | |

**भाग - क: तिमाहीमध्ये कळविण्यात आलेल्या फसवणुकींचे गुन्हेगार निहाय वर्गीकरण**

**बँकेचे नाव** ____________________________________

| वर्ग | कर्मचारी | | ग्राहक | | बाहेरील व्यक्ती | | कर्मचारी व ग्राहक | | कर्मचारी व बाहेरील व्यक्ती | | ग्राहक व बाहेरील व्यक्ती | | कर्मचारी, ग्राहक व बाहेरील व्यक्ती | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम |
| रु १ लाखपेक्षा कमी | | | | | | | | | | | | | | | | |
| रु १ लाखच्या वर पण रु २५लाखपेक्षा कमी | | | | | | | | | | | | | | | | |
| रु २५ लाख व अधिक | | | | | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | | | | | |

**टीप:** १) वरील प्रकार-निहाय वर्गीकरण भारतीय दंड संहितेच्या निरनिराळ्या तरतुदींवर आधारित असे आहे.
२) सर्व रकमा रु. लाखामध्ये दोन दशांश स्थळापर्यंत द्याव्यात.

**प्रमाणपत्र** प्रमाणित करण्यात येत आहे की, गेल्या तिमाहीत रिझर्व बँकेला कळविण्यात आलेल्या रु १ लाख व त्यावरील रकमेच्या फसवणुकी, ह्या बँकेच्या संचालक मंडळालाही कळविण्यात आल्या असून, त्या वरील भाग अ (स्तंभ ४ व ५) आणि भाग ब व क मध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

सही ____________________ स्थळ ____________________

नाव व पदनाम ____________________ तारीख ____________________

**एफएमआर - ३**

## मोठ्या रकमेच्या फसवणुकींवरील तिमाही प्रगती अहवाल

(परिच्छेद ४.२ अनुसार)

**बँकेचे नाव ______________________**

**रोजी संपलेल्या तिमाहीसाठी विवरणपत्र ___________________________**

**भाग अ : सारांशरुपाने माहिती**

| | माहिती | संख्या | संबंधित रक्कम (रु - लाख) |
|---|---|---|---|
| १ | शिल्लक प्रकरणे | | |
| २ | कोणतीही प्रगती नसलेली प्रकरणे (खाली दिलेल्या भाग ब मधील नमुन्यानुसार प्रकरण - निहाय तपशील द्यावा. | | |
| ३ | प्रगती असलेली प्रकरणे (खालील भाग क मधील नमुन्यानुसार प्रकरण - निहाय तपशील द्यावा. | | |

**भाग बः कोणतीही प्रगती नसलेल्या प्रकरणांचा तपशील**

| **क्र.** | **शाखाचे नाव** | **फसवणुक क्र.** | **पक्ष/ खात्याचे नाव** | **रक्कम (रु लाख मध्ये** |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**भाग क : प्रगतीचा प्रकरण निहाय तपशील**

**पक्ष/खात्याचे नाव ____________________**

**शाखा/कार्यालयाचे नाव ______________________**

**संबंधित रक्कम____________________________**
**(रु. लाखमध्ये)**

**फसवणुक क्रमांक _________________________**

| | |
|---|---|
| १) सर्वप्रथम कळविण्याची तारीख | |
| २)<br>अ. सहकारी कोर्ट मध्ये वसुलीच्या दावा दाखल करण्याची तारीख | |
| ब. सध्याची स्थिती | |
| ३) मागील तिमाही च्या अखेरपर्यंत मध्ये केलेली वसुली (रु लाख) | |
| ४) ह्या तिमाहीत केलेली वसुली | |
| अ. संबंधित पक्षांकडून | |
| ब. विम्याच्या रुपाने | |
| क. इतर स्त्रोतांमधून | |
| ५) एकूण वसुली (३+४) (रु लाख) | |
| ६) बँकेला आलेला तोटा (रु लाख) | |
| ७) ठेवलेली तरतुदी (रु लाख) | |
| ८) राईट - ऑफ केलेली रक्कम (रु लाख) | |
| ९)अ. पोलिस/सीबीआय ह्यांना प्रकरण कळविण्याची तारीख | |
| ब. तपास पूर्ण झाल्याची तारीख | |
| क. तपासणीचा अहवाल सादर केल्याची तारीख | |
| | |

१०) कर्मचाऱ्यांबाबत केलेल्या कारवाईचा तपशील

| क्र. | नाव | पदनाम | निलंबित केले काय | आरोपपत्र दिल्याची तारीख | अंतर्गत चौकशी सुरु केल्याची तारीख | अंतिम आदेश देण्याची तारीख | चौकशी पूर्ण झाल्याची तारीख | दिलेली शिक्षा | खटला भरण्याची/ दोषी ठरविण्याची/सुटका होण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | |

| | |
|---|---|
| ११) इतर घडामोडी | |
| १२) ह्या तिमाहीत प्रकरण बंद करण्यात आले काय? | होय/नाही |
| १३) बंद करण्याची तारीख | |

## एफएमआर-४

## डाका/लूटमार/चोरी/ बँकफोडीवरील अहवाल
## (परिच्छेद ८ अनुसार)

**बँकेचे नाव ____________________**

**___________________________रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अहवाल**

| शाखेचे नाव | पत्ता | जिल्हा | राज्य | १० शाखेचा प्रकार | जोखीम वर्गीकरण ११ | करन्सी चेस्ट शाखा आहे काय | आर्म्ड गार्ड ची संख्या | प्रकरणाचा प्रकार १२ | घडल्याची तारीख व वेळ | संबंधित रक्कम (रु लाख) | वसुल झालेली रक्कम (रु लाख) | विम्याच्या दाव्याची तरजोड (रु लाख) | अटक करण्यात आली | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | कर्मचारी | चोर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | | | | | | | | | |

| ठार झाले | | | जखमी | | दोषी सिध्द | | दिलेला मोबदला प्रत्यक्ष रुपयात | | केलेली कारवाई | गुन्हा क्रमांक आणि जेथे गुन्हा दाखल केला त्या पोलिस स्टेशनचे नाव | करण्याची रीत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्मचारी | चोर | इतर | कर्मचारी | इतर | कर्मचारी | चोर | कर्मचारी | इतर | | | |
| १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ |
| | | | | | | | | | | | |

--------------

१० ग्रामीण/अर्धनागरी/नागरी/महानगरी

११ उच्च/सर्वसाधारण/नीच

१२ डाका/दरोडा/चोरी/लुटमार